# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २३.०६.२०२२ गुरूवार**

**(गुन्हे)**

**१) पो.स्टे. पारडी :— खुनाचा प्रयत्न करण्याऱ्या आरोपीस अटक:—**

दिनांक २२.०६.२०२२ चे २१:०० वा चे सुमारास फिर्यादी दिनेश्वरी किशन शाहू वय २९ वर्ष रा. नागेश्वनगर बि. प्लॉट नं. ११५, पारडी, नागपुर यांना शेजारी राहणारा आरोपी विजय चंद्रभान डंभारे वय ४५ वर्ष व त्याचा १७ वर्षीय मुलगा यांनी घरा शेजारी सिमेंट शिट ठेवण्याचे कारणवरून शिवीगाळ करून लोखंडी रॉडने फिर्यादीस हातावर व सासु उत्तरा मानसिंग शाहु वय ५० वर्ष यांना हातावर मारून गंभीर जखमी केले व फिर्यादीचे पती किशन मानसिंग शाहु वय ३० वर्ष यांना डोक्यावार मारून जिवेठार मारण्याचा प्रयत्न केला. जखमींचा उपचार मेयो हॉस्पीटल येथे सुरू आहे. आरोपीस अटक केले असुन मुलास ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. पारडी येथे पोउपनि वाघ, ८२७५४१२८२४ यांनी आरोपी विरूध्द कलम ३०७,५०४,५०६,१०९,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोदविला आहे. .

**२) पो.स्टे. हिंगणा, वाडी — प्राणांतीक अपघात :—**

**अ) हिंगणा —** दिनांक २२.०६.२०२२ चे १२:१५ वा. चे सुमारास पो.स्टे. हिंगणा हद्दीत डोंगरगाव टोल नाक्या जवळ मच्छी मार्केट समोर हिंगणा येथुन फिर्यादी हे त्यांचे दुचाकी क्र. एम.एच. ३२.टी. ८९५४ ने सोबत नामे ओकिल यादव सह जात असतांना विरूध्द दिशेने येणाऱ्या दुचाकी क्र. एम.एच. ४०.ए.इ. ५६६२ चा चालक आरोपी नामे दिलीप धनराज लोंढे वय ५५ वर्षे रा. बोथली, बुट्टीबोरी.याने त्याचे ताब्यातील वाहन ट्रिपलसीट भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन समोरून धडक देवुन फिर्यादी व मित्र यांना व स्वत:सह, दुचाकी वरिल दोघांना गंभीर जखमी केले. जखमीला उपचारा कमी मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता उपचारा दरम्याण आरोपीस डॉक्टरांनी मृत घोषीत केले. इतर जखमींचा उपचार खाजगी रूग्णालयात सुरू आहे. याप्रकरणी फिर्यादी संजय परमेश्वर यादव वय ३५ वर्ष रा. सेलु जिल्हा वर्धा यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे हिंगणा येथे पोउपनि राउत, ९७६४८२२९०९ यांनी कलम ३०४(अ),२७९,३३७ भादवि सहकलम १३४ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**ब) वाडी :—** दिनांक २२.०६.२०२२ चे २१:२५ वा. चे सुमारास पो.स्टे. वाडी हद्दीत मारोती सेवा शोरूम समोर अमरावती रोड येथुन राष्ट्रपाल सुरेश शेंडे वय ३१ वर्ष रा. भिवसन खोरी गौतमनगर हे त्यांची पत्नी सौ. जोत्सना वय २६ वर्ष व मुलगा रिदोय वय ४ वर्ष यांचे सह मोटर सायकल क्र. एम.एच. ३१.इ.व्ही. ९८०३ ने जात असतांना कार क्र. एम.एच. ०४ एफ.बि. ४१४१ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन मागुन धडक देवुन राष्ट्रपाल याचे मृत्युस कारणीभुत झाला व पत्नी व मुलास गंभीर जखमी केले. जखमी उपचारा कामी मेयो हॉस्पीटल येथे दाखल आहे. याप्रकरणी फिर्यादी संदिप रमेश उके वय २४ वर्ष रा. यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे वाडी येथे पोउपनि पाठक, ९६९८५६८०९६ यांनी आरोपी विरूध्द कलम ३०४(अ),२७९,३३७,३३८ भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**<u>आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर तर्फे जनतेला आवाहन :—</u>**

पो.स्टे. हुडकेश्वर येथे अप.क्र. २२६/२०२२ कलम ४२०,४०६,४०९,१२०(ब) भा.दं.वि. सहकलम ३ MPID ॲक्ट १९९९ प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयातील आरोपी क्र. ०१) अभिषेक गजानन पाच्चाव, वय २८ वर्षे व आरोपी क्र. ०२) प्रियंका अभिषेक पाच्चाव, दोन्ही रा. प्लॉट नं. १२, रेणुकामाता मंदीर हुडकेश्वर रोड, नागपूर यांनी प्रा.प्रा. Horizon Investment आणि H.A. Advisory and Software Private Limited स्थापन करुन "फॉरेक्स ट्रेडींग मार्केट" मध्ये ट्रेडींग करतो आणि त्यात दर दिवसाला प्रॉफीट मिळते परंतू त्यांना दर दिवसाला गंतवणुकदाराला पैसे देता येत नाहीत म्हणून दर महिन्याला २० ते ३० टक्के दराने प्रॉफीट देतो असे आमिष देवून फिर्यादीने व इतर गुंतवणुकदाराने पैसे गुंतविले. मात्र सर्व आरोपींनी संगणमताने कट करुन फिर्यादीस व इतर गुंतवणुकदारांनी त्यांचेकडे विश्वासाने सोपविलेल्या रक्कमेचे गुंतवणुकदारांना व्याज न देता तसेच गुंतवणूक केलेली रक्कम परत न करता त्यांचे पैशाचा लबाडीने अपहार करुन पळून गेलेले आहे. अशा फिर्यादी नामे वैभव सुरेश पांडव, वय ४० वर्षे यांच्या रिपोर्ट वरुन आरोपी क्र. ०१) अभिषेक गजानन पाच्चाव, वय २८ वर्षे ०२) प्रियंका अभिषेक पाच्चाव, दोन्ही रा. प्लॉट नं. १२, रेणुकामाता मंदीर हुडकेश्वर रोड, ३) डॉ. रोशन मनोहर भिवापुरकर, क्युरी हॉस्पीटल, दिघोरी, नागपूर, ४) गजानन पाच्चाव रा. प्लॉट नं. १२, रेणुकामाता मंदीर हुडकेश्वर रोड, ५) करण अशोक आकरे, वय २७ वर्षे, धंदा ट्रान्सपोर्ट रा. धनगवळी नगर, प्लॉट नं. ०४, पिपळारोड, हुडकेश्वर, ६) रमाकांत अनंत कुलकणी, ७) विक्की नरेंद्र टाले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे. गुन्हयांचा तपास मा. पोलीस आयुक्त, मा. सह पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त, मा. पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि सुष्मा बिसंदरे आ.गु.शा. हे करीत आहेत.

आरोपीतांनी Horizon Investment आणि H.A. Advisory and Software Private Limited च्या माध्यमातुन गुंतवणुकदारांना आमिष देवून त्यांचेकडून लाखो रुपयाची गुंतवणुक स्वीकारली आहे. तरी सदर कंपनीमध्ये गंतवणुक केलेल्या गुंतवणुकदारां आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांच्याजवळ असलेले गुंतवणुकीबाबतचे उपलब्ध कागदपत्रासह आर्थिक गुन्हे शाखा, कार्यालय, पोलीस भवन, पहिला माळा, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर शहर या ठिकाणी संपर्क करावा.

**(राहुल डोंगरे)**
सहा. पोलीस निरीक्षक
पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर